**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

वर्ष -९ | गोंदिया | अंक २८ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार,दि.१७ ते २३ जून २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021









बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ


## प्रदुषित पांगोलीच्या पुर्नजीवनाकडे लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष

**गोंदिया:** राइस मिल्स, लाख कारखाने, टाइल्स कारखाने आदि कारखान्यांतून सतत वाहणाऱ्या दूषित पाण्यामुळे आणि राइस मिलमधून निघणाऱ्या राखेमुळे एकेकाळी जिल्ह्याचे वैभव म्हणून ओळखली जाणारी पांगोली नदी आज दुषित पाण्यामुळे दुर्लक्षीत झाली आहे. राईस मिलच्या सर्वाधिक दुषित पाण्याने नदीचे आयुष्यच संपुष्टात येऊ लागले आहे. त्यातही या नदीचे जीवन वाचविण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून कार्य करणाऱ्या संस्थेलाही प्रशासनाने सहकार्य केले नाही. यावरून पांगोलीच्या दुरावस्थेला जिल्हा प्रशासन राईस मिलर्स आणि राज्य प्रदुषण महामंडळाचे अधिकारी हेच दोषी ठरले म्हटल्यास वावगे होणार नाही. जिल्ह्यात उगम पावलेल्या नद्यांपैकी या नदीचे वैशिष्यच जरा वेगळे आहे. शेत शिवारातून आपली वाट मोकळी करत गोंदिया तालुक्यातील फ ुलचूर गावाजवळून विशेष म्हणजे जिल्हा प्रशसनाच्या प्रशासकीय इमारतीच्या शेजारुन वाहणाऱ्या या नदीच्या पुर्नजीवनासाठी व उत्थानासाठी आजपर्यंतच्या एकाही लोकप्रतिनिधीला व जिल्हाधिकाऱ्याला पाजर फुटले नाही. यावरून या लोकप्रतिनिधीसह जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांमधील मानुसकीचा चेहराच हरविल्याचे



चित्र आहे.

एकेकाळी शेतकरी अन गोंदिया, गोरेगाव, आमगाव तालुक?यांतील शेकडो नागरिकांची तहान भागविणारी पांगोली नदी. परंतु, आज अस्तित्वच कळेना. मी उथळ झालेय. पाण्याची साठवणूक करता येईना.नदीपात्र प्रदूषित झाल्याने माझे जुने रुप आता फक्त आठवणीपूरतेच उरले आहे. त्या जुन्या रुपाला पुन्हा समोर आणण्यासाठी काहींनी प्रयत्न केलेत. स्थानिक प्रशासन, लोकप्रतिनिधींपासून थेट मंत्रालय गाठले; मात्र अजून कोणाचेही लक्ष गेले नाही.

गोरेगाव तालुकयातल्या तेढा या गावी असलेल्या सरोवरातून पांगोली नदीचा उगम. गोंदिया तालुकयाला लागून असलेल्या खातिया गावाजवळ छिपीया येथे मध्य प्रदेश राज्यातील बालाघाट सीमारेषेवरील वाघ नदीत पांगोली नदीचा विलय होतो. पुढे ती वैनगंगा नदीला वाघनदीच्या रुपात मिळते. गोंदिया व गोरेगाव या दोन्ही तालुकयांतील जवळपास ६० किलोमीटर क्षेत्र तसेच आमगाव तालुकयातील जवळपास १५ किलोमीटर क्षेत्र मी व्यापले आहे. गोंदिया, गोरेगाव तालुकयांतील शेकडो शेतकरी पांगोली नदीच्या पाण्यावर शेती पिकवत असतात.आमगाव तालुकयातील काही गावांनाही पाण्याचा लाभ होतो. यातून शेकडो कुटुंबांचा उदरनिर्वाह चालत असतो. मात्र, आजघडीला पांगोली नदीची अवस्था अतिशय बिकट झाली असून. अस्तित्वाच्या खुणा नदी शोधत आहे. पात्र उथळ होत चालले आहे. त्यामुळे पावसाळ्यात साचलेले पाणी वर्षभर साचून राहत नाही. पात्रातून अवैधरित्या वाळूउपसा केला जातो. काठांवरील झाडांची अनिर्बंध कटाई होत असल्याने काठ नष्ट होत आहेत. त्यामुळे पात्र आकाराने मोठे होत असून, उथळ होऊ लागले आहे. काठावर माती साचल्याने खोली मात्र कमी होत आहे.विशेष म्हणजे, उगमापासून विलयापर्यंत एकाही ठिकाणी बांध अथवा बंधारे शासकीय यंत्रणेकडून बांधण्यात आले नाहीत. नदी पात्रात दरवषी अंत्यसंस्कार, मूर्ती विसर्जन केले जाते. परिणामी नदी प्रदूषित झाले आहे. गाळ साचण्याचे प्रमाण वाढले आहे. परंतु, प्रशासनाचे गाळउपशाकडे दुर्लक्ष झाले आहे. आणि हो, माझ्या काठाशेजारील, मला मिळणाऱ्या नाल्याशेजारील राइस मिल्स, लाख कारखाने, टाइल्स कारखाने व प्रशासनाने मंजुरी दिलेल्या कारखान्यांतून सतत वाहणारे दूषित पाणी, राइस मिलमधून निघणारी राख यामुळे पाणी दूषित झाले आहे. जलप्रदूषण वाढले आहे. अशा पाण्याच्या वापरामुळे शेती, नागरिक व जनावरांचे आरोग्य धोकयात आले आहे. पाणी पिण्यायोग्य तर राहिलेच नाही, शेती आणि जनावरे, जंगली प्राण्यांसाठीदेखील अनुपयुक्त आहे.

दरम्यान, पांगोली नदीचे पुनरुज्जीवन व्हावे, विकास व्हावा, याकरिता गोंदियातल्याच समाजोन्नती बहुउद्देशीय ग्रामीण व शहरी विकास संस्थेने गेली कित्येक वर्षे स्थानिक प्रशासन, लोकप्रतिनिधींपासून थेट मंत्रालयापर्यंत पत्रव्यवहार केला. निवेदने दिली; पण निगरगट्ट सरकारला अजूनही जाग आली नाही. याच वर्षी पुन्हा जानेवारीत या संस्थेने स्थानिक खासदारांमाफ ‘त थेट पंतप्रधान मोदी यांना निवेदन पाठवले. वाटलं होतं, माझा आतातरी विकास होईल, पुनरुज्जीवन होईल; पण कोणीही काहीच हालचाली सुरू केल्या नाहीत. आता पावसाळा येतोय, पाण्याची गरज तिन्ही तालुकयांतील नागरिक, शेतकऱ्यांना, त्यांच्या जनावरांना भासेल; पण नदी प्रदूषित झाले आहे.



पांगोली नदी ही जिल्ह्याची जीवनदायिनी आहे. मात्र, ही नदी प्रदूषित झाली आहे. त्यामुळे पाण्याचा उपयोग कोणालाही करता येत नाही. आम्ही या नदीच्या पुनरुज्जीवनासाठी, किंबहुना विकासासाठी अनेकदा स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांना निवेदने दिली. पत्रव्यवहार केला. जिल्हाधिकाऱ्यांना समस्या समजावून सांगितली; परंतु कोणाचेही या नदीकडे लक्ष जाऊ नये, हे दुर्भाग्य आहे. या नदीच्या विकासासाठी आमचा लढा अविरत सुरू राहील.

**तीर्थराज उके, समाजोन्नती बहुउद्देशीय ग्रामीण व शहरी विकास संस्था, गोंदिया**

## वर्षानुवर्ष बैठक न झाल्याने रखडले कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण

**बोगस कामावर टिकलेय जिल्हापरिषदेचे आयएसओ नामांकन**



गोंदिया-सातवा वेतन आयोग लागू होऊन वर्ष लोटले,परंतु त्या वेतन आयोगानुसार आणि सलग १० वर्ष एकाच आस्थापनेवर नोकरी झालेल्या कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती लागू करण्यात येते.परंतु नावाने आयएसओ प्रमाणपत्र बळकावणाऱ्या गोंदिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीसह प्रशासनाला कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण निकाली काढण्यास वर्ष लागत असल्याने प्रशासन कासवाच्या गतीने चालल्याचे बघावयास मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार गेल्या सहा महिन्यापासून तर बैठकच कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण काढण्यासाठी घेण्यात आलेली नाही.

त्यातच जिल्हा परिषद प्रशासनाचा डोलारा सांभाळणाऱ्या सामान्य प्रशासन विभागाकडे ५० ते ६० फाइल कालबद्ध पदोन्नतीसाठी अडकून पडल्या आहेत.त्याचप्रमाणे आरोग्य विभाग,कृषी विभागासह पंचायत विभागातील ग्रामसेवकांच्या कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण वर्षानुवर्षे पडून राहत असल्याने जिल्हा परिषदेचे अधिकारी हे फक्त वेळकाढू धोरण राबवून मि ळालेल्या आयएसओ प्रमाणपत्राची टिंगलटव्वाळी करीत आहेत असे म्हणण्याची वेळ आली आहे.त्यातच हे कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण रखडलेले असतानाच चतुर्थ श्रेणी कर्मचारी पदोन्नतीचेप्रकरणही सामान्य प्रशासन विभागाने रेंगाळत ठेवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सातवा वेतन आयोग लागू होण्यापूर्वी सलग १२ वर्ष एकाच पदावर नोकरी केलेल्या कालबद्ध पदोन्नती लागू करण्यात यायची.तो कालावधी आता सातव्या वेतन आयोगानंतर १० वर्ष झाले आहे.नियमित पदोन्नती,कालबद्ध पदोन्नती करिता एक ठराविक वेळापत्रक तयार करण्याची गरज असताना जिल्हा प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.त्यातच सातव्या वेतन आयोगानंतर यात मोठ्या संख्येने वाढ झाली आहे.कालबद्ध पदोन्नतीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली जाते.त्या समितीमध्ये सर्वच विभागाचे विभागप्रमुख हे सदस्य असतात तर सदस्य सचिव हे साम ान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी असतात.

संबंधित विभागप्रमुखाला आपल्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीचे प्रकरण तयार करून समितीसमोर ठेवायचे असते परंतु विभागप्रमुखही त्याकडे काणाडोळा करीत असल्याचे चित्र आहे.आजही शिक्षण विभाग,समाजकल्याण, पंचायत विभाग,आरोग्य,पशुसंवर्धन विभागात असे अनेक प्रकरणे प्रलबिंत असल्याचे बोलले जाते.विशेष म्हणजे ज्या समि तीसमोर किंवा विभागप्रमुखाच्या कार्यालयात हे प्रकरण सादर केले जाते,त्यावेळी एकाच प्रकरणात एकदाच त्रुट्या न काढता अनेकदा काढून त्या प्रकरणाला लांबवण्याचे काम संबंधित विभागातील कर्मचारी जो स्वतःला तज्ञ समजून घेत असतो त्याच्याकडून सातत्याने होणारा हा प्रकार जिल्हा परिषदेत नवा राहिलेला नाही.मग तो कालबद्ध पदोन्नतीप्रकरणातील त्रुट्या असो की वैद्यकीय बिलातील त्रुट्या असो ते एकासोबत न काढता अनेकदा काढून वेळकाढू धोरण निव्वळ आर्थिक लाभासाठीच केले जात असल्याचेही काही प्रकरणात घडल्याचे बघावयास मिळाले आहे.

## भाडेतत्वावरील वाहनाने हाश्मींचा डीआरडीएत ठिय्या

**गोंदिया**ः-गोंदिया जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी एस.ए.ई.हाश्मी यांचा अद्यापही जिल्हा परिषद यंत्रणेचा मोह सुटेना अशी अवस्था झाली आहे.अति.मुकाअ करीता असलेले वाहन जरी त्यांनी सोडले असले तरी त्यादिवसापासूनच जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्याकडे असलेले एक वाहन त्यांना त्या दिवसापासूनचे सेवेत उपलब्ध झाल्याची माहिती समोर आली आहे.

त्यातही सोमवार व मंगळवारला त्यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या फुलचूर आयटीआय कार्यालयात जिल्हा परिषदेत भाडेतत्वावर लावलेले वाहन क्रमांक एमएच ३५ एजी १३३४ ने दाखल होत जिल्हा परिषदेची यंत्रणा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशावर नव्हे तर आपल्या एका आवाजावर कशी चालते हेच दाखविण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे दिसून आले.

गेल्या दोन दिवसापासून हाश्मी हे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयात जवळपास दीड ते अडीच तास बसून राहत असल्याची माहिती सुत्रांनी दिली असून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या विभागप्रमुखाचेही आता नियंत्र राहिले नसल्याचे बोलले जात आहे.

३१ मार्चला सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांची सेवा विनपगारी कोवीड-१९ करीता घेण्यात आली होती.त्या संधीचा लाभ घेत त्यांनी सुरवातीला जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय ईम ारतीमध्ये आपले बस्तान मांडले.त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील मानव विकास कार्यालयात बस्तान मांडून जिल्हा परिषदेच्या बांधकाम व लपा विभागाच्या अधिकाऱ्यांना फाईल घेऊन बोलावत ३१ मार्चच्यापुर्वीच्या तारखेत अनेक काम करण्याचा दबावतंत्र त्यांनी वापरल्याची चर्चा होती.

त्या सर्वांचे सविस्तर वृत्त बेरार टाईम्सने सतत प्रकाशित करुन प्रशासनाचे लक्ष वेधले त्यानंतर शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश शिवहरे यांनीही दखल घेत मुख्यमंत्र्यापर्यत या प्रकरणाची तक्रार केली.त्या सर्वामुळे जिल्हाधिकारी यांनी १० जून रोजीच त्यांना कोवीड १९मधून वाहनासह कार्यमुक्त केले.त्यानंतरही हाश्मी यांनी जिल्हा परिषदेचा पिच्छा काही सोडलेला नाही

## कतारवरुन आलेले ३० रुग्णासंह जिल्ह्याची शतकाकडे वाटचाल

**गोंदिया-** जिल्ह्यात कोरोना विषाणूचा संसर्ग दिवसेंदिवस वाढत आहे.सलग पाचव्या दिवशी आणखी १३ कोरोना बाधित रुग्ण आढळुन आले आहेत. १६ जून रोजी प्राप्त अहवालावरून हे रुग्ण कोरोना बाधित असल्याचे स्पष्ट झाले असून सर्व तिरोडा तालुक्यातील आहेत.त्यातच हे सर्व कतार(खाडी देश)वरुन आलेले रुग्ण आहेत.त्यांना गोंदिया शहरातील विविध संस्थात्मक अलगीकरण केंद्रात ठेवण्यात आले आहेत.१० जून नंतर गोंदिया जिल्ह्यात कतार या देशातून भारतसरकारच्या वंदेभारत



अभियानंतर्गत परतलेले आहेत.विम ानाने मुंबईत आल्यानंतर हे सरळ गोंदियाला आले असून त्यांची संख्या जवळपास ६२ आहे.त्या सर्वांना संस्थात्मक अलगीकरण केंद्रात ठेवण्यात आले असून यापैकी ३० जणांचे रिपोर्ट गेल्या ५ दिवसात पॉझिटिव्ह आढळून आले आहेत.आत्तापर्यंत १३३२ जणांचे नमुणे तपासण्यात आले असून १११३ जणाचे अहवाल निगेटिव्ह आले आहेत.९९ बाधित रुग्णापैंकी ६९ जणांना सुट्टी मिळालेली आहे.

२६ मार्चला पहिला रुग्ण बाधित आढळल्यानंतर सलग ३९ दिवस जिल्हा कोरोनामुक्त होता.त्यानंतर १९ मे रोजी दोन रुग्ण आढळून आले.त्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे २१ मे रोजी तब्बल सत्तावीस रुग्ण आढळून आले.त्यानंतरही बाधित रुग्ण जिल्ह्यात आढळण्याचे सत्र हे सुरूच होते. २२ मे रोजी दहा रुग्ण, २४ मे रोजी चार रुग्ण, २५ मे रोजी चार रुग्ण, २६ मे रोजी एक रुग्ण, २७ मे रोजी एक रुग्ण, २८ मे रोजी ९ रुग्ण, २९ मे तीन रुग्ण,३० मे रोजी चार रुग्ण,३१ मे रोजी एक रुग्ण,२ जून रोजी दोन ,१२ जून रोजी एक रुग्ण ,१३ जून रोजी एक रुग्ण आणि आज १४ जून रोजी एक आणि १५ जून रोजी १४ व १६ जून रोजी १३ रुग्ण असे एकूण ९९ रुग्ण आतापर्यंत कोरोना बाधित आढळून आले आहे.

## भंडारा जिल्ह्यात कोरोना बाधितांची संख्या ५३

**भंडारा**-जिल्ह्यात २ व्यक्तींचा अहवाल कोरोना पॉझिटिव्ह आला आहे. पॉझिटिव्ह रुग्ण पवनी येथील आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत ४१ व्यक्तींनी कोरोनावर यशस्वी मात केली आहे. जिल्ह्यात आता १२ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण उपचार घेत आहेत. आतापर्यंतच्या कोरोनाबाधितांची संख्या ५३ एव्हढी आहे.

नागपूरच्या विषाणू चाचणी प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या स्वॅबचा अहवाल आज १६ जून रोजी प्राप्त झाला असून आज दोघांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. जिल्ह्यातील कोरोना बधितांची संख्या ५३ इतकी असून यामध्ये क्रियाशील रुग्ण १२ आहेत तर ४१ रुग्ण आतापर्यंत कोरोनामुक्त झाले आहेत.



## नक्षल्यांनी तीन वाहने जाळली

**कोरची:** सशस्त्र नक्षल्यांनी सोमवारला (दि.१५) दुपारी ४ वाजताच्या सुमारास कोटगूल-गोडरी-नाडेकल रस्त्याच्या कामावरील दोन ट्रॅक्टर व एका टिप्परची जाळपोळ केली. यामुळे परिसरात दहशत निर्माण झाली आहे.

कोरची येथील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आरआरपी-२ योजनेंतर्गत कोटगूल-गोडरी-नाडेकल या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु आहे. २९ किलोमीटर लांबीच्या या महामार्गाच्या कामाची अंदाजपत्रकीय किंमत २४ कोटी रुपये असून, चंद्रपूर येथील लक्ष्मी कंस्ट्रक्शन कंपनी हे काम करीत आहे. काम सुरु असताना सोमवारला दुपारी सशस्त्र नक्षल्यांनी २ ट्रॅक्टर व एका टिप्परची जाळपोळ केली.

## शरणार्थी तिबेटियनच्या भारतातील वास्तव्याला ६१ वर्ष



**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया:** तिबेटच्या एका खेड्याची प्रतिकृती आपल्याला गोंदिया जिल्ह्यातील गोठणगावला निश्चितपणे बघायला मिळू शकते. हे छोटेसे तिबेटी लोकांचे गाव अर्जुनी मोरगाव तालुक्यात आहे. हे तिबेटी लोक निर्वासित असून भारत सरकारच्या मदतीने त्यांच्यासाठी येथे खास वसाहत वसविण्यात आली आहे. सुरुवातीला या वसाहतीचे स्वरूप ङ्गतिबेटी कॅम्पफ्चे होते. आता त्याला एका तिबेटी खेड्याचे स्वरूप प्राप्त झाले असून हे खेडे तिबेटी संस्कृतीचे दर्शन घडविते.चौदावे दलाई लामा तेनजीन ग्यात्सो हे यांचे आध्यात्मिक नेते आहेत. ते तिबेटमध्ये करुणेचे बोधीसत्व व संरक्षक संत अवलोकितेश्वर यांचे अवतार मानले जातात. त्यांना १९८९ मध्ये शांतीचा नोबेल पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे.ङ्ख

“स्वातंत्र्याचा दुर्दम्य आशावाद व नसानसात देशाभिमान ”भिनलेले ते तिबेटीयन पाहुणे मागील ६१ वर्षांपासून भारतात वास्तव्यास आहेत. अद्याप त्यांनी भारताचे नागरिकत्व स्वीकारले नाही. आज ना उद्या तिबेट स्वतंत्र होईल या प्रतीक्षेत ते आहेत.७ ऑक्टोबर १९५० तिबेटीयनांसाठी काळा दिवस ठरला.४० हजार चीनी सैनिकांनी थांगत्सी नदी ओलांडून मध्य तिबेटमध्ये प्रवेश केला. छाम्दो येथे सुरक्षा सेनेला पराभूत केले. चीन आक्रमणापूर्वी ६० लाख लोकसंख्या असलेले तिबेट हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून ओळखले जात होते. चीनद्वारा तिबेटवरील आक्रम णाचा जगात निषेध झाला. परंतु साम्यवादी चीनवर त्यांचा कुठलाही परिणाम झाला नाही. तिबेटीयनांनी केलेली निदर्शने, आंदोलने चीनने दडपून हजारों महिला-पुरुषांना जीवे मारले. हा अन्याय, अत्याचार असह्य झाला.

१७ मार्च १९५९ रोजी चौदावे दलाई लामा यांनी सुमारे ८० हजार लोकांसोबत भारतात शरण घेत वास्तव्यास आले.आजमितीस भारतात तिबेटीयनांची संख्या १ लाख १ हजार २४२ एवढी आहे. जगात राष्ट्रप्रमुखाचा दर्जाप्राप्त दलाई लामांनी हिमाचल राज्याच्या धर्मशाळा येथे निर्वासित तिबेट सरकारचे अधिष्ठान स्थापन केले. भारतात हिमाचल प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, छत्तीसगड, ओरीसा व जम्मू कश्मिर या राज्यात एकूण १५ शेतकीप्रधान तर हिमाचल प्रदेश, उत्तराखंड व पश्चिम बंगाल राज्यात १४ ठिकाणी हस्तव्यवसाय व उद्योग प्रधान वसाहती आहेत. दिल्ली, मेघालय,



कुल्लू, मुंदुवाडा, सिक्कीम, बोमदीला येथेही विखुरलेल्या वसाहती आहेत.

महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर गोंदिया जिल्ह्याच्या अर्जुनी-मोरगाव तालुक्यातील गोठणगाव (प्रतापगड) येथे महाराष्ट्रातील एकमेव तिबेटीन वसाहत आहे.

नागीलिंग तिबेटीयन असे या वसाहतीचे नाव आहे.१९७२ मध्ये ही वसाहत अस्तित्वात आली. १३० घरांमध्ये ११०३ लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. सुरुवातीला ते इटियाडोह धरणाच्या शेजारी तंबूत राहू लागले. कालांतराने शासनाने बुटाई नं. १ नजीक या निर्वासितांचे पुनर्वसन केले. २ कुटुंबांना एक घर मिळून २ कॅम्प तयार झाले. शासनाने प्रतिव्यक्ती ६० डिसमिल या प्रमाणे प्रत्येक कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी शेत जमिन दिली. एकूण ६१२.८० एकर जमिनीत ही वसाहत आहे. यापैकी ४०५ एकर जागार शेतीची आहे.हिमाचलच्या कुलू व डलहौजी पर्वतावर थंड वातावरणात राहणारी ही मंडळी पूर्व विदर्भाच्या उष्ण व दमट वातावरणात दाखल झाली. उष्णतेच्या काहिलीने त्रस्त झालेले हे लोक दिवसभर इटियाडोह धरणाच्या कालव्यातील पाण्यात बुडून असायचे. भात शेती व स्वेटर विक्री हा यांचा मुख्य व्यवसाय आहेत. ते प्रचड कष्टाळू आहेत. या व्यवसायाच्या भरवशावरच वर्षभर ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. कुण्या एकेकाळी सुमारे पाच वर्षांपूर्वी येथील गालीचे सर्वदूर प्रसिद्ध होते. मात्र या गालीच्यांना महाराष्ट्रात अत्यल्प मागणी आहे. त्यामुळे हळूहळू हा व्यवसाय मोडकळीस आला.

गोठणगावच्या या वसाहतीत दोन तिबेटी संप्रदायाचे नागरिक राहतात. त्यात ङ्गनिमाफ संप्रदाय प्रमुख समजला जातो त्यांनी वेगळेपण जपले आहे. तिबेटीयन कलेचे दर्शन घडविणारे बौद्ध विहार त्या लोकांनी येथे बनविले असून ते बघण्यासारखे आहे. स्वित्झर्लंडकडून मिळालेल्या मदतीच्या सहाय्याने येथे एक वृद्धाश्रमही सुरू करण्यात आला आहे.

स्थानिक पंचायत राज सांभाळणारी सहकारी संस्था, एक विचार संघटना, तिबेटी जडीबुटींचे एक आयुर्वेदिक औषधालय वगैरे येथे आढळून येतात. ज्यामुळे आपल्याला तिबेटीयन संस्कृतीचा परिचय होतो. येथील बौद्ध मंदिरात तिबेटहून आलेले सहा धर्मगुरू वास्तव्यास आहेत. त्यांनी मतदानाचा हक्क घेतलेला नसून तात्पुरत्या रहिवासी पत्रावर ते येथे वास्तव्य करीत आहेत. त्यांच्या कुटुंबातील प्रत्येकी एक सदस्य भारतीय सेनेत आहे.



येथील तिबेटीयन लोक त्यांच्या पारंपरिक वेशभूषेतच दिसून येतात. संध्याकाळची वेळ होती. बरेचसे लोक मंदिरात दर्शनासाठी उपस्थित राहतात.टिपीकली तिबेटीयन आकाराचे, डिझाइन व पेंटिंगचे हा विहारात एक मोठा रोलर असून तो हे लोक गोल गोले फि रवितात.तिबेटी लोकांचा ङ्गसुमोरफ नावाचा मांसाहारी समोसा व रुचकर शेवयांचा येथे गेल्यावर बघावयास मिळतात.बौद्ध विहारातील मोठमोठे नगारे व लांब आवाजातील मंत्रोच्चारामुळे पवित्र वातावरण येथे तयार झाले आहे.

या वसाहतीमध्ये आज तेथील विद्यार्थ्यासांठी शिक्षणाची सोय आठवीपर्यंत आहे.सेंट्रल तिबेटीयन स्कूल ॲडमिनिस्ट्रेशन नवी दिल्लीच्या कार्यक्षेत्रात.आठवी उत्तीर्ण केल्यावर दुसऱ्या वसाहतीम धील उच्च शिक्षणासाठी पाठवले जाते.येथील लोकांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी आरोग्य केंद्र आहे,जे धर्मशाळेकडून चालविले जाते.त्याचप्रमाणे बहुउद्देशीय तिबेटियन को ऑपरेटिव्ह सोसायटी ही महाराष्ट्र सरकारद्वारा मान्यताप्राप्त आहे.ज्यामाध्यमातून तिबेटीयन सदस्यांना कर्जपुरवठा व शेतीसाठी साहित्य खरेदीकरीता आर्थिक मदत उपलब्ध करुन दिली जाते.तिबेटीयन वसाहतमीमधील वृध्दांच्या देखरेखीकरीता एक वृध्दाश्रम सुध्दा याठिकाणी आहे.

## संपादकीय

# पाण्याचे संकट चिघळते आहे

गेल्या वर्षी मान्सून विचित्र होता. काही वेळा काही कालावधीमध्ये अजिबात पाऊस पडला नाही, त्यानंतर काही वेळा अल्प कालावधीपुरता, काही वेळा मुसळधार पाऊस झाला. मुंबईमध्ये साधारणत: १० जून रोजी येणा–या पावसाचे आगमन २५ जून २०१९ रोजी झाले. गेल्या १० वर्षामध्ये पावसाळ्याचे सर्वात उशिराने झालेले हे आगमन आहे; परंतु ५ दिवसांच्या कालावधीमध्ये, गेल्या २५ वर्षात जून महिन्यात पडलेल्या पावसापेक्षा जास्त पाऊस झाला. हा प्रकार संपूर्ण मान्सूनमध्ये दिसून आला. एक कालावधी असा होता, ज्यात दहा दिवस संपूर्ण हंगामापेक्षा जवळजवळ निम्माच पाऊस झाला. तज्ज्ञांच्या मते, हवामानातील बदलाचा पाण्याच्या चक्रावर झालेला हा परिणाम आहे.

पाण्याचे चक्र म्हणजे विविध प्रक्रियांचा नाजूक समतोल असतो, जसे बाष्पीभवन, आर्द्रता व वर्षण. ऊबदार हवामानामुळे वातावरणाची पाणी धारण करून ठेवण्याची क्षमता वाढते व बाष्पीभवनाचा दरही वाढतो. एका मर्यादेनंतर, अतिरिक्त बाष्पीभवन व आर्द्रता वाढते. नॅशनल वाइल्डलाईफ फ ेडरेशनने तयार केलेल्या "अत्यंत टोकाचे हवामान आणि अमेरिकेतील ऊर्जा पायाभूत सुविधा" या शीर्षकाच्या अहवालानुसार, तापमानामध्ये झालेल्या प्रत्येक दहा फॅरनहाइट (०.५५० सेंटिग्रेट) वाढीमुळे धारण क्षमता चार टक्के वाढू शकते आणि पावसाच्या पद्धतीमध्ये व्यत्यय येऊ शकतात.

अमेरिकेतील नॅशनल ग्राउंडवॉटर असोसिएशनच्या वेबसाईटने म्हटले आहे, पृथ्वीवर असणा–या पाण्यापैकी ९७.२ टक्के पाणी हे समुद्रांमध्ये आहे. २.१५ टक्के पाणी हिमनद्यांमध्ये व अन्य बर्फामध्ये आहे. ०.००५ टक्के आणि मातीतील ओलाव्यामध्ये व ०.००१ टक्के वातावरणात आहे, तर ०.००९ टक्के पाणी हे शुद्ध पाण्याच्या तलावांमध्ये, ०.००८ टक्के अंत: क्षेत्री समुद्रांमध्ये, ०.००१ टक्के पाण्यामध्ये व ०.६१ टक्के जमिनीखाली आहे. पाण्याचे शेवटचे तीन स्रेत पृथ्वीवरील पाण्यामध्ये ०.६२७१ टक्के पर्यंतच्या पाण्याची भर घालतात. हे पाणी आपल्याला वापरण्यासाठी उपलब्ध असते. याकडे पाहण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे, आपल्याला वापरासाठी उपलब्ध असणा–या सर्व पाण्यापैकी ९७ टक्के पाणी हे भूजल आहे. यातून, आपल्या जीवनातील भूजलाचे महत्त्व स्पष्ट होते.

हवामानातील बदलामुळे पावसाचे वेळापत्रक बिघडले; परंतु प्रत्येक वेळी या प्रकारांची तीव्रता मोठी असेल, तर पाणी वाहून जाण्याची समस्या आणखी चिघळेल. यामुळे भूजलाची पातळी पुन्हा वाढण्याची प्रक्रिया कमी होईल. यामुळे पाण्याच्या कमतरतेची समस्या वाढणार आहे.

गेल्या काही वर्षात पृथ्वीवरील शुद्ध पाण्याचे प्रमाण तेवढेच राहिले आहे. वातावरणामध्ये सातत्याने पुनर्वापर केला जातो आणि नंतर हे पाणी पुन्हा आपल्याला मिळते. मात्र, लोकसंख्येचा विस्फोट झाला आहे. याचा अर्थ, पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी, आंघोळीसाठी व शाश्वत जीवनासाठी सातत्याने व स्वच्छ पाण्याचा पुरवठा होण्याच्या बाबतीत दरवर्षी स्पर्धा वाढते आहे. काही जणांना पाण्याची कमतरता ही संकल्पनाच कळत नाही, तर अनेकांसाठी हे दुर्दैवी वास्तव आहे. प्रमाणाबाहेर होणारे नागरीकरण आणि भूजलाचा अमर्याद उपसा यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष्य अधिक तीव्र होत आहे.

भारतामध्ये अगोदरच पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. पाऊस पडण्याच्या पद्धतींमध्ये बदल होत आहेत. शहरीकरणामुळे पाणी वाहून जाण्याचे प्रमाण वाढते आहे आणि पाणी झिरपण्याचे प्रमाण घटते आहे. लोकसंख्या वाढते आहे आणि भूजल उपसण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. युनेस्को वर्ल्ड वॉटर डेव्हलपमेंट अहवालाच्या मते, सर्वाधिक प्रमाणात भूजल उपसण्यामध्ये जगात भारत आघाडीवर असून भारतात दरवर्षी २६० क्युबिक किमी पाण्याचा उपसा केला जातो. हे प्रमाण चीन व अमेरिका यांच्या एकत्रित उपशापेक्षाही अधिक आहे. जगभर उपसल्या जाणा–या भूजलापैकी हे २५ टक्क्यांपर्यंत आहे. एकेकाळी भारत हा पाण्याची विपुलता मुबलक असणारा देश होता. १९५१ मध्ये देशात दरडोई पाण्याची उपलब्धता ५१७७ एमथ्री हून अधिक होती, तर त्यानंतर देशात पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होऊ लागले व २०११मध्ये पाण्याची दरडोई उपलब्धता १५४५ एमथ्रीपर्यंत कमी झाली. अंदाजे ६०० दशलक्ष लोकांना पाण्यामुळे कमालीचा ताण सहन करावा लागत असून, नीती आयोगाने २०१८ अहवालातील भूजलाच्या अतिरिक्त उपशाबद्दल बोलताना, यास "इतिहासातील सर्वात भीषण जल समस्या" असे म्हटले आहे.

भारतात ८० टक्क्यांहून अधिक शुद्ध पाण्याचा वापर पिकांना सिंचन करण्यासाठी केला जातो. अनेक भागांमध्ये पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध नसल्याने पुरेशा सिंचनावर परिणाम होतो आणि पिकांची उत्पादकता कमी होते. सधन देशांमध्ये कॉर्पोरेट वापरासाठी पाण्याचा विनियोग एकूण पाण्याच्या ४० टक्के इतका उच्च आहे आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्याचा अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. विकसनशील देशांमध्ये मोठी लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी शेती क्षेत्रावर अवलंबून असल्याने आणि सधन देशांमध्ये मोठी लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी बिझनेसवर अवलंबून असल्याने, जगातील प्रत्येक चार नोक–यांपैकी तीन नोक–या पाण्यावर अवलंबून आहेत आणि आपल्या अर्थव्यवस्थेसाठी व समाजासाठी भविष्यात जलसुरक्षा निर्माण करणे गरजेचे आहे, असे मत "युनेस्को' ने वर्तवले आहे.

मर्यादित आकलन असल्याने जलस्रेतांचे कमी मूल्यांकन केले जात आहे. पाण्याच्या संकटामुळे तिसरे जागतिक युद्ध पेटेल, असे म्हटले जाते. पाण्याच्या आर्थिक मूल्यानुसार पाण्याचा दर ठरवला जावा, असा आग्रह तज्ज्ञांचा आहे; परंतु हा सामाजिक व राजकीयदृष्ट्या स्वीकाराला जाईल, असा उपाय नाही. पाण्याचा पुनर्वापर केला, तर पाण्याचे दुर्भिक्ष्य कमी होण्यासाठी मदत होणार आहे. याबरोबरच, लक्षणीय प्रमाणात रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि शेतीमध्ये सूक्ष्म–सिंचनाचा वापर हे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध राहील, याची दक्षता घेण्यासाठी अवलंबता येऊ शकतात. या तीन पर्यायांचा वापर एकाच वेळी व मोठ्या प्रमाणात केला, तर अधिक सलोख्याचे जग निर्माण करणे शक्य होऊ शकते.

# पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त शिवसेनेने केले वृक्षारोपण



**गोंदिया**:– राज्याचे पर्यावरण मंत्री व शिवसेनेचे युवाप्रमुख आदित्य उध्दव ठाकरे यांच्या (१३ जून) वाढदिवसानिमित्त गोंदिया जिल्हा शिवसेनेच्यावतीने गोंदिया व तिरोडा विधानसभा मतदारसंघात १००१ विविध प्रजातींच्या(फळ,फुलासह कडुनिंब,आंबा,बेहडा,आवळा,वड,पिपंळ,जांभुळ आदी)झाडांचे वृक्षारोपण करण्यात आल्याची माहिती गोंदिया जिल्हा शिवसेना प्रमुख मुकेश शिवहरे यांनी दिली.

वृक्षारोपण कार्यक्रम गोंदिया व तिरोडा विधानसभा मतदार संघात यशस्वी करण्याकरिता जिल्हा प्रमुख मुकेश शिवहरे, उपजिल्हाप्रमुख तेजराम मोरघडे, सुनिल पालांदुरकर, जिल्हा सघंटक सुनिल लांजेवार,, जिल्हा समन्वयक पंकज यादव, तालुकाप्रमुख टोकेश हरिणखेडे, राजेंद्र चामट, मेघराज चौधरी, युवासेना तालुकाधिकारी प्रीती कटरे, शहराधिकारी आशू मक्कड, ऋषभ मिश्रा, शहर प्रमुख गुड्डू उके, विधानसभा प्रमुख टिल्लू गुप्ता, उपजिल्हाप्रमुख अशोक अरखेल, गोलू डोहरे, शहर संघटक विनीत मोहीते, महिला आघाडी प्रमुख श्रीमती मोहीता मक्कड, सफाई कामगार आघाडी प्रमुख राजा करियार आदिंनी सहकार्य केले.

**अर्जुनी/मोर** :– तालुका शिवसेना–युवासेना तर्फे युवासेना प्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे पर्यटक आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसा निम्मित भव्य वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण कार्यक्रम दरम्यान सामाजिक अंतर आणि सुरक्षेचा सम्पूर्ण पालन करीत तब्बल १०० विविध प्रकारची झाडे परिसरात लावली गेली.

शिवसेना संपर्क प्रमुख नीलेश धुमाळ व युवासेना सचिव नीलेश पाटिल यांच्या मगर्दर्शना खाली युवासेना तर्फे सम्पूर्ण जिल्ह्यात वृक्षारोपन कार्यक्रम राबवित असल्याची माहिती युवासेना जिल्हा प्रमुख (युवाधिकारी)अश्विनसिंह गौतम यानी कार्यक्रमा दरम्यान दिली.

वृक्षारोपण कार्यक्रम दरम्यान शिवसेना उपजिल्हा प्रमुख शैलेश जायसवाल,शिवसेना जिल्हा सचिव संजयसिंह पवार, तालुका प्रमुख अजय पालिवाल,शहर प्रमुख तथा नगर सेवक प्रकाश उईके, युवासेना उपतालुका अधिकारी छत्रपाल कापगते,युवासेना शहर प्रमुख महेश शहारे, शिवसैनिक यादव कुम्भरे ,सुनील मांडवगने, युवासैनिक अमित शहारे, कामेश काळसर्पे, अल्तु पठान, रोशन गजबे,आदि उपस्थित होते.



## शिवसेना जिल्हाप्रमुख शिवहरेंनी केली युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरेंच्या वाढदिवसाला सपत्नीक नेत्रदानाची घोषणा



गोंदिया–नुकतेच १० जून ला राष्ट्रीय नेत्रदान दिन पार पडले.त्यातच शिवसेना युवा प्रमुख व राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य उध्दव ठाकरे यांचा १३ जून रोजी वाढदिवस असल्याने त्या वाढदिवसाच्या निमित्ताने गोंदिया जिल्हा शिवसेना प्रमुख मुकेश शिवहरे यांनी पत्नी टिमू मुकेश शिवहरे सह मरणोपरांत नेत्रदानाचा संकल्प जाहिर केला.

विशेष म्हणजे यापुर्वी तत्कालीन पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांनी २० ऑगस्ट १९८५ ला सपत्नीक नेत्रदानाचे संकल्पपत्र भरून वाढदिवस साजरा केला होता. अंधत्व निवारणासाठी भारतात १९७६ पासून स्वतंत्रपणे राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येतो.

अंधत्व दूर करण्यासाठी "दृष्टी २०२०' हे विशेष अभियान भारतात राबविण्यात येत आहे. आज जगातील अंधांची संख्या पाच कोटींच्या जवळपास असून, त्यातील जवळपास दीड कोटी भारतात आहे. यापैकी ६० लाख हे कॉर्नियामुळे (ZolnQ>b) अंधत्व आलेले आहेत. या अंधांपैकी जवळपास ६० टक्के बालके ही १२ वर्षांखालील आहे. भारतात दरवर्षी १ लाखांपेक्षा जास्त नेत्रपटलांची आवश्यकता असून सध्या केवळ ५० हजार नेत्रपटले नेत्रदानाद्वारे उपलब्ध होतात. उपलब्ध नेत्रपटलांपैकी केवळ ६० टक्के नेत्रपटले प्रत्यारोपणासाठी वापरण्यात येते. भारतात अडीच लाख अंधांना बुबुळ प्रत्यारोपणाच्या माध्यमातून दृष्टी देता येते.

नेत्रदान म्हणजे आपले डोळे गरजू अंध व्यक्तींना दृष्टी येण्यासाठी आपल्या मृत्यूनंतर दान देणे होय.नेत्रदानासाठी स्त्री–पुरुष, जाती, वंश, धर्म आणि वय हा भेद मानला जात नाही. कोणत्याही वयोगटाच्या व्यक्तीस नेत्रदान करता येते या सर्व गोष्टींचा विचार करुन शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश शिवहरे यांनी १३ जून रोजी पर्यावरण मंत्री व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरेंच्या वाढदिवसाला नेत्रदान करण्याचा संकल्प करुन एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

## जगत महाविद्यालयातर्फे कोवीड१९ काळात राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन

**गोरेगाव–** स्थानिक जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरे–गाव येथे कोवीड १९ च्या काळात शैक्षणिक चर्चा घडवून शैक्षणिक स्तर उंचवण्यासाठी ग्रंथालय विभागामार्फत बहुजन हिताय जगत शिक्षण सस्थेचे अध्यक्ष जगतरामजी रहांगडाले व सचिव नारायणरावजी येळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .एन.वाय.लंजे यांच्या अध्यक्षतेखाली अध्ययन व अध्यापण कौशल्यात ग्रथांलयाची भूमिका या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होत.

या वेबीनारचे बीजभाषक म्हणून एम. एस.एस.आय .एस .डब्ल्यू . महाविद्यालयाचे ग्रथंपाल डॉ .प्रीन्स अजयकुमार आगासे तर प्रमुख वक्ता म्हणून बी .आर .आंबेडकर महाविद्यालयाचे उपग्रथंपाल डॉ .शिवा कनौजिया शुक्ला व इन्फ्लोवर सेंटर गांधीनगर,गुजरातचे वैज्ञानिक डॉ .पल्लव प्रधान यांनी मौलिक मार्गदर्शन केले .सदर वेबीनारमध्ये मोठ्या संख्येने झूमव्दारे प्राध्यापक, विद्याथी, अभ्यासक, श्रोते सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ .एन .वाय .लंजे यांनी मौलिक मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरीता महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस .एच .भैरम,ग्रंथपाल प्रा.इ .व्ही .चंदनखेडे, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.या वेबीनारचे संचालन डॉ.जी .के .भगत तर आभार प्रा .इ.व्ही .चंदनखेडे यांनी मानले .

## गुलामी भारतातली

मानसाने पहिल्यांदा कुर्त्याला मित्र केले मग स्वार्थापोटी गुलाम केले आणि एवढे गुलाम केले की कुत्रा माणसा समोर लाचार झाला, एवढा लाचार झाला की माणसाने फटके मारले तरी त्याच्यापुढे शेपटी हलवत फटके खातो. काहीही झाले तरी आता तो माणसाची गुलामी गुलामी सोडणार नाही.

शेतकऱ्याने सांडाला प्रेमाने जवळ केले मग त्याला आपल्या कामासाठी गुलाम केले आणि एवढे गुलाम केले की त्याच्या बच्यासाठी असलेले दूध आपल्या बच्यासाठी व आपल्यासाठी वापरले एवढेच नाही तर त्याची नसबंदी करून त्याला नैसर्गिक सेक्सच्या सुखापासून वंचित केले व त्याचा बैल बनवला तरी सांडाने विद्रोह केला नाही,आता कधीकाळी मदमस्त सांड असलेला हा प्राणी एवढा बैल झाला की त्याला आता बैलगिरीतच आनंद वाटायला लागला.आता हा त्याची बैलगीरी सोडणार नाही म्हणजेच गुलामी सोडणार नाही.

कुंभाराने गाढवाला पकडून कामाला जुंपले, गाढवाने विरोध जरूर केला पण पोटभर जेवण मिळाल्यामुळे गाढवही खुश झाले. आता कुंभाराने त्याची कमजोरी पकडली आणि जेवणही कमी केलं आणि गाढवानेही ते सहन केले आता गाढव हळूहळू कुंभाराचे गुलाम झाले गाढवाला आता कुंभाराची व गुलामीची एवढी सवय झाली की त्याला वाटतच नाही की तो कुंभाराचा गुलाम आहे.

घोड्याचा धावण्याचा वेग आणि रुबाब पाहून सैनिकाने घोड्याला पकडले व त्याच्या पाठीवर बसला घोड्याने पूर्ण शक्तिनिशी विरोध केला पण शेवटी सैनिकांने त्याला कधी प्रेम ाने तर कधी फटक्याने वश केले लढाई करणे ही सैनिकांची गरज होती घोड्याची नाही पण



हळूहळू या सैनिकांने घोड्याला आपला गुलाम केले व लढाईसाठी वापरले आणि घोडा आता सैनिकाची गुलामी वाहण्यात आपली शान समजू लागला पण प्रत्यक्षात आहे तो सैनिकाचा गुलामच, गुलामी आता त्याच्या एवढी अंगवळणी पडली की तो लग्नाच्या वराती समोर ढपक्यासारखा नाचतो पण गुलामीतून मुक्त व्हायचा प्रयत्नही करीत नाही.

जुन्या काळात जंगलातून मोठमोठी लाकडे आणने म्हणजे कठीण काम होते पण माणसाने डोके वापरले, हत्तीला प्रेमाने जवळ केले त्याच्या अंगावरून हात फिरवला व हळूहळू त्याला गुलाम केले.आता हा माहूत या शक्तिमान प्राण्याकडून मोठमोठी कामे करून घ्यायला लागला.अगोदर हा त्याला साखळदंडाने बांधायचा आता हत्ती नावाच्या गुलामाला फक्त साध्या दोरीने बांधतो कारण हा हत्ती आता या माहुताचा गुलाम झालेला आहे .

गुलाम करायची प्रक्रिया फार प्राचीन आहे ही प्रक्रिया माणसानेच निम ाण केलेली आहे, व या प्रक्रियेद्वारे शक्तिमान मानसांनी शक्तीहीन लोकांना व बुद्धिमान मानसांनी बुद्धीहीन लोकांना गुलाम केलेले आहे व स्वत:साठी वापरले आहेत याची कित्येक उदाहरणे इतिहासात सापडतील.प्राण्याने प्राण्यांना कधिही गुलाम केलेले नाही प्राण्याने प्राण्याला गुलाम केल्याचे उदाहरण सापडत नाही पण माणसाने माणसाला गुलाम केलेले आहे.

पण जेव्हा गुलामांना संधी मिळाली तेव्हा गुलामांनीही त्यांच्या मालकांना संपवून टाकले व मुक्त झालेले आहेत असेही उदाहरणे इतिहासात भरपुर सापडतात, म्हणूनच जगात बहुतांशी मानव स्वतंत्र आहे. पण प्राणी मात्र माणसा विरुद्ध असे करणार नाही कारण त्याची बुद्धी ही मर्यादित आहे.

जेव्हा इथल्या बुद्धिमान पण धूर्त माणसांना असे वाटले की आता यापुढे सामान्य माणसाला गुलाम ठेवणे शक्य नाही तेव्हाच या धूर्त माणसाने मानसाला गुलाम ठेवण्यासाठी ईश्वरी संकल्पनेचा सहारा घेतला व माणसाला गुलाम ठेवलेले आहे व आजही इश्वरी या संकल्पनेची माणसे गुलाम झालेली आहेत त्यामुळे म ंदिरात एका दगडाला कोट्यावधी रुपयाचे दान देऊन ईश्वराच्या नावाखाली आपल्या मालकाच्या जगण्याची व ऐशोआरामाची सोय आजही गुलाम माणसे करीत आहेत.

आज कोरोना वायरस ने हे स्पष्ट दाखवून दिले आहे की जगात कोणीही ईश्वर नाही,अल्ला नाही,परमेश्वर नाही कारण असता तर तो त्याच्या बंद्यासाठी,भक्तासाठी अनुयायांसाठी आज नक्कीच धावून आला असता. आज ईश्वरी संकल्पनेचे ढोंग उघडे होवून ङ्गदूध का दूध आणि पाणी का पाणी झाले आहेङ्ग तरीपण हे ईश्वरी,परमेश्वरी संकल्पनेचे गुलाममानव मात्र गुलामच राहतील कारण या इश्वरीसंकल्पनेच्या माध्यम ातूनच यांची बुद्धी गोठवण्यात आलेली आहे, आता यांनाही कुर्त्यासारखी ,बैलासारखी, गाढवासारखी, घोड्यासारखी व हत्तीसारखी गुलामीची सवय झालेली आहे त्यामुळे यांच्या जिवनाचा महत्वपुर्ण घटक म्हणजे यांचा वेळ, श्रम, बुध्दी व पैसा हा अनुत्पादक कार्यात बर्बाद होत आहे, म्हणजेच यांचे जिवन बर्बाद होत आहे.

**म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की**

गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या मग तो बंड करून उठेल ङ्ग पण बंड तोच करतो जो स्वत:ला गुलाम समजतो. बाबासाहेबांनी दलित लोकांना गुलामीची जाणीव करून दिल्याम ुळे समाजातील माझ्यासारखे कित्येक माणसांनी इश्वरीगुलामी विरुद्ध बंड केले आहे व ईश्वराला एका झटक्यात फेकून दिलेले आहे. भारतात ईश्वरी संकल्पनेचा उपयोग लोकांना कायमचे गुलाम ठेवण्याकरिता झालेला आहे व होत आहे म्हणून या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी ईश्वरी संकल्पनेला फेकून देणे ही काळाची गरज आहे ईश्वरी संकल्पनेला फेकून दिल्यास बहुजनसमाज ब्राह्मणाच्या गुलाम ीतून नक्कीच मुक्त होईल अन्यथा गुलामीतच सडणार आहे.

**प्रमोद मून, नागपूर**
**मो.९४२३०६३१२७**

# जिल्हा परिषद बांधकाम व लपा विभागातील कामाची चौकशी करण्याची शिवहरे यांची मागणी

**गोंदिया**,:–गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम व अर्थ विभागाच्यावतीने करोना संसर्गाच्या काळात शासन निर्देशाची अवहेलना करीत १०० टक्के कामांचे नियोजन करुन प्रशासकीय मान्यता देत कामाचे करारनामे वाटप केल्याप्रकरणी तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग व लघु पाटबंधारे विभागाची सखोल चौकशी करण्याची मागणी असलेले निवेदन शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश शिवहरे यांनी मुख्यमंत्र्याकडे केली आहे.सोबतच त्या निवेदनाची प्रत विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केली असून शिवहरे यांच्या या तक्रारीमुळे जिल्हा परिषदेत खळबळ निर्माण झाली आहे.

शासन करोना संसर्गाचा प्रादुर्भाव थांबविण्यासाठी प्रयत्नरत असतानाच मात्र गोंदिया जिल्हा परिषदेचे सेवा निवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी हाशमी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करीत नियमबाह्य कामे बांधकाम सभापतीला हाताशी धरुन कंत्राटदारांना वाटप केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.सोबतच शासनाने अत्यावश्यकामाची गरज असेल असे काम व ३३ टक्केपेक्षा अधिक नको या निर्देशाचे पालन केले नसल्याचे म्हटले आहे.

जिल्हा परिषदेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत राहिलेले एस.ए.ई.हाश्मी हे ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले.मात्र त्यांनी एप्रिल व मे दोन महिने गोंदियात थांबून ३०५४,२५१५,२५५४,जिल्हा निधी,जिल्हा रस्ते दुरुस्ती निधी,१०१/२७/१ जि.प प्रशासकीय इमारत किरकोळ दुरुस्ती व रंगरंगोटी,१०१/२७/९ रस्त्याचे बांधकाम व इतर बांधकामे परिक्षण यात अधिकच्या रुपयाच्या कामांचे प्रशासकीय मान्यता देणे,आदी विविध योजनेतील कामांना ३१ मार्चपुर्वीच्या तारखेत बांधकाम सभापतीना सोबत घेऊन मंजुरी देण्याचे काम करीत कामे विक्रीचा गोरखधंदा केलेल्या तक्रारीची दखल मुख्यमंत्री कार्यालयाने घेतल्याची माहिती शिवहरे यांनी दिली आहे.


**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत)**

# कार्ल लँडस्टेनर यांचा जन्मदिवस म्हणजे जागतिक रक्तदाता दिवस

सन २००४ मध्ये जागतिक आरोग्य संघटना, रेड क्रॉस, रेड क्रेसेंट सोसायटीचे आंतरराष्ट्रीय फेडरेशन यांनी १४ जून रोजी सर्वप्रथम "रक्तदाता दिवस" साजरा केला. जागतिक आरोग्य संघटना, रेड क्रॉस आणि रेड क्रेसेंट सोसायटी (Red Crescent Societies), आंतरराष्ट्रीय फेडरेशन ऑफ ब्लड डोनर ऑर्गनायझेशन (IFBDO) आणि इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन इम्यूनो हिम ॅटोलॉजी (ISBTI) या सारख्या हेल्थ केअर एजन्सीज संयुक्तपणे आंतरराष्ट्रीय संघटना आयोजित करतात. जागतिक स्तरावर लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रम करतात. सन २००४ च्या सुरुवातीला स्वस्थ व्यक्तीने स्वेच्छेने आणि न चुकता केलेले रक्तदान हे समाजात आवश्यक लोकांची जागरुकता वाढविण्याच्या उद्देशाने सुरु केले होते.

जागतिक रक्तदाता दिवस अधिकृतपणे जागतिक आरोग्य संघटनेने सन १९५२ मधील १९२ सदस्यांसह सन २०५ मध्ये ५८ व्या जागतिक आरोग्य परिषदेत स्थापन केला. या वर्षीचे स्लोगन "Give Blood And Make World A Healthier Place. रक्तदान करा आणि जगाला एक आरोग्यदायी स्थान बनवा हे आहे.

**डॉ. कार्ललँडस्टेनर यांचा परिचय** : रक्तगटाचा जनक डॉ. कार्ललँडस्टेनर यांचा जन्म १४ जून १८६८ साली व्हिएन्ना, ऑस्ट्रेलिया येथे झाला. कार्ल लँडस्टेनर यांचे शिक्षण व्हिएन्ना (ऑस्ट्रेलिया) येथील शाळेत झाले. सुरुवातीपासूनच त्यांना वैद्यकीय शिक्षणाबद्दल उत्सुकता होती. त्यामुळे त्यांनी व्हिएन्ना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश




घेऊन १८९१ साली कार्ललँडस्टेनर यांना वैद्यकीय पदवी मिळाली. वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी जीवरसायन शास्त्रातील मुलभूत प्रक्रियांचा खास अभ्यास केला.

डॉ. कार्ललँडस्टेनर यांनी अन्नाचा रक्तातील घटकांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करून आपल्या संशोधकांचा पाया रचला. पुढील पाच वर्षे रसायनशास्त्राचा अभ्यास करीत त्यांनी इमिल, फिश्वर, वुझबर्ग व बँम्बर्गर, म्युनिच अशा संशोधकांसोबत अभ्यास करून झुरीच येथील हेन्ट्स प्रयोगशाळेत संशोधन केले. पुढे त्यांनी व्हिएन्ना येथील सार्वजनिक रुग्णालयात नोकरी केली व तेथेच आरोग्य विज्ञानाचा अभ्यास सुरु केला. सन १८९६ मध्ये मॅक्स गुबूर यांचे सहायक म्हणून डॉ. कार्ल लँडस्टेनर यांची नियुक्ती झाली.

**ABO रक्तगटाचा जनक** :– शरीरात रक्त व त्यांचे इतर घटक यामुळेच शरीरातील अनेक प्रक्रिया चालतात. सर्व शरीरात ऑक्सिजनचा पुरवठा रक्तपेशींमुळेच होतो. शिवाय रोगप्रतिकारशक्तीही रक्तातील लढवय्या पेशींमुळे चालू असते. मानवाच्या शरीरात ए, बी, एबी, ओ असे चार प्रकारचे रक्तगट असतात. तसेच आर. एच. फॅक्टर पॉझिटिव्ह व निगेटिव्ह असे दोन प्रकार आहे.

ए,बी, ओ या रक्तगटाचा शोध डॉ. कार्ल लँडस्टेनर यांनी १९०० साली लावला. तसेच आर. एच. फॅक्टर शोध आणि सन १९०९ साली पोलिओ विषाणूचा शोध लावून त्यांनी जगात प्रसिद्धी मिळविली. त्यांच्या या शोधासाठी योगदानाबद्दल त्यांना १९३० साली आरोग्य व औषधशास्त्रातील नोबेल पारितोषिक देऊन सन्म ानित करण्यात आले. याचबरोबर १९०२ साली 'एबी' या रक्तगटाचा शोध डिकास्टेलो आणि स्टली यांनी लावला. सन १९४० साली डॉ. कार्ल लँडस्टेनर व ए.एस. व्हिनेर (Weiner) यांनी Rhesus नावाच्या माकडांमध्ये एक विशेष प्रकारचे प्रतिजन सापडले. त्याला ठह (आर एच) फॅक्टर असे नाव दिले. अशा प्रकारे डॉ. कार्ल लँडस्टेनर यांच्या योगदानाबद्दल त्यांना "रक्तगटाचा जनक" म्हणतात.

**रक्तदात्यांमध्ये कोरोना विषाणूची भीती व लॉकडाऊन** : देशभरात सुरु असलेल्या कोरोना विषाणूमुळे देशात तसेच महाराष्ट्रात लॉकडाऊनची भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. याचा परिणाम माणसाचे आरोग्य व मानसिकतेवर झाला. याचा परिणाम रक्तपेढ्यांवरसुद्धा झाला. त्यामुळे रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा जाणवू लागला. रक्तपेढीत रक्तसाठा अत्यंत कमी प्रमाणात होऊ लागला. रुग्णालयात रक्ताची कमतरता भासू लागली. रक्तदात्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे आयोजकांनी रक्तदान शिबिरे रद्द केली. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि आरोग्य मंत्री राजेश टोपे जनतेला रक्तदानासाठी आवाहन करीत होते. रुग्णालयात थॅलेसिमिया, हिमोफिलिया, अपघातग्रस्त, तातडीच्या शस्त्रक्रिया, एड्स, कॅन्सर, ॲनेमिया इ. आजाराच्या रुग्णांना रक्ताची गरज भासू लागली.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि आरोग्य मंत्री राजेश टोपे तसेच शासनस्तरावर केलेल्या आवाहनाला साथ देत लॉकडाऊनच्या काळात तसेच आजच्या परिस्थितीत आपण तसेच रक्तदात्यांनी जर पुरेशी काळजी व सोशल डिस्टन्सिंगचा योग्य वापर करून रक्तदान केल्यास रक्तदात्याला कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही. तेव्हा अशा जनजागृतीपर रक्तदात्यांनी सोशल डिस्टन्सिंगचा योग्य वापर करून रक्तदान शिबीरे सुरुहोऊ लागली.

राज्य रक्तसंक्रमण परिषदेच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात दररोज ४ ते ५ हजार रुग्णांना रक्ताची गरज भासते. मानवी रक्ताला दुसरा कोणताही पर्याय नसल्यामुळे रक्तदाता हा रुग्णांसाठी महत्त्वाचा दुवा ठरतो. याकरिता सोशल डिस्टन्सिंग व योग्य काळजी घेऊन रक्तदान शिबीर आयोजित करून रुग्णांना सुरक्षित रक्तपुरवठा केला जाऊ शकतो. यासाठी रक्तदात्यांनी योग्य काळजी व सोशल डिस्टन्सिंगचा योग्य वापर करुन रुग्णांसाठी जवळच्या अथवा आयोजित ऐच्छिक रक्तदान शिबिरात पुढाकार घेऊन स्वेच्छेने रक्तदान करुन सामाजिक बांधिलकीची जोपासावी.

१४ जून डॉ. कार्ल लँडस्टेनर यांचा जन्म दिवस. हा "जागतिक रक्तदाता दिवस" म्हणून जगात तसेच आपल्या देशात साजरा केला जातो. कोरोना विषाणूची भीती न बाळगता योग्य काळजी घेऊन व सोशल डिस्टन्सिंग ठेवून 'रक्तदाता' म्हणून समाजाप्रती साम ाजिक बांधिलकी जोपासून रक्तदान करावे, हे नम्र आवाहन..!

**हेमकांत सोनार**
**जिल्हा रुग्णालय रक्तपेढी**
**अलिबाग–रायगड**
**मो.९५११८८२५७८**

# मान्सून पुर्व तयारीचे सुक्ष्म नियोजन करा-जिल्हाधिकारी डॉ.बलकवडे



**गोंदिया:** जिल्हयातील धरण, जलाशये, तलाव, नद्या इत्यादी ठिकाणी मागील वषीच्या तुलनेत यावषी पाणीसाठा जास्त आहे. त्यामुळे मान्सून कालावधीत अचानक पाऊस पडल्यास जिल्हयातील ८७ गावांना पुराचा धोका नाकारता येत नाही. येणाऱ्या पुराच्या आपत्तीची तिव्रता कमी करण्यासाठी सर्व विभागांनी मान्सूनपुर्व तयारीचे सुक्ष्म नियोजन करावे. असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. कादंबरी बलकवडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात डॉ.बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली मान्सुन पुर्व तयारीचा आढावा ११ जून २०२० रोजी आयोजित सभेत घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. सभेला जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजा दयानिधी, सहा.जिल्हाधिकारी रोहन घुगे, सावन कुमार,अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांची् प्रामुख्याने उपस्थिती होती

डॉ. बलकवडे पुढे म्हणाल्या की, आपत्तीचे स्वरुप मोठे किंवा लहान असले तरी त्याचे सुक्ष्म नियोजन करणे गरजेचे आहे. जलसंपदा व महसुल विभाग यांनी योग्य समन्वय साधुन काम करावे. जिल्हयातील रस्ते, जलाशये, जीर्ण इमारती, शाळा, महाविद्यालयाच्या इमारतीची मान्सुनपूर्व तयारीच्या अनुषंगाने तपासणी करुन वापरण्यास योग्य असल्यास तसा अहवाल सादर करावा.असे सांगितले.

पुर परिस्थितीत संबंधित यंत्रणांनी तात्काळ प्रतिसाद देणे, संबंधीत माहिती विचारुन दक्षता घेऊन शोध व बचावकार्य करण्याचे निर्देश देऊन डॉ. बलकवडे म्हणाल्या, पुर परिस्थीतीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात कायमस्वरुपी हॅलीपॅड बांधण्या संबंधाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी तसेच संबंधित तहसिलदारानी समन्वय ठेवून काम करावे. जिल्हयातील पर्यटनस्थळे, धरण, जलाशये, तलाव तसेच धोक्याच्या ठिकाणी कुणीही सेल्फी घेतांना किंवा गदी करतांना आढळल्यास त्यांच्या विरुध्द योग्य कार्यवाही करावी.

डॉ.बलकवडे म्हणाल्या, पुर परिस्थीतीचा सामना करण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये समन्वय स्थापित करण्यासाठी जिल्हयातील तालुका, नगर परिषद, नगर पंचायत, प्रभाग, वार्ड आणि ग्रामीण पातळीवर ग्रामपंचायत तसेच गावपातळीवर आपत्ती व्यवस्थापन समिती गठित करावी. जेणेकरुन पुर परिस्थीतीत ग्राम पातळीपर्यत समन्वय साधला जाऊ शकेल तसेच पुर परिस्थीतीत जिवीत व वित्तीय हानीचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल.असे त्या म्हणाल्या. सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांना आपत्ती व्यवस्थापन समिती गठित करण्याचे निर्देश डॉ.बलकवडे यांनी दिले. उपविभागीय अधिकारी तथा तहसिलदार यांना पुर प्रवण ८७ गावांचा सुक्ष्म आराखडा तयार करुन मान्सून कालावधीत सुरक्षित स्थळ (निवारा) चिन्हांकित करुन नियोजन करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता यांना धरणाचे पाणी सोडण्यापुवी सर्व संबंधितांना सूचना देण्याबाबत, पोलिस विभागाला पाण्याखाली बुडालेले रस्ते, पुल या ठिकाणी बॅरीकेटींग लावून बंदोबस्त करण्याबाबत, पुरवठा विभागाला पुर प्रवण सर्व ८७ गावात धान्याचा साठा उपलब्ध करण्याबाबत, विद्युत विभागाला मान्सून पुर्व विद्युत तारांवर झाडांच्या खांद्या कापणे, कार्यकारी अभियंता बाघ इटियाडोह यांना धोक्याचे ठिकाणात रेडीयमचे फलक लावण्याबाबत, आरोग्य विभागाला सर्व आरोग्य केन्द्रात औषधांचा पर्याप्त साठा व पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांची माहिती सर्व ग्रामपंचायतीत लावण्याचे निर्देशही डॉ.बलकवडे यांनी दिले. जिल्ह्यातील सर्व नगर परिषद , नगर पंचायत यांना नाले, नालींची स्वच्छता करुन जीर्ण इमारतीच्या मालकीच्या लोकांना नोटिस देण्याचे निर्देश डॉ.बलकवडे यांनी दिले.

या सभेला उपविभागीय अधिकारी सर्वश्री रविंद्र राठोड (देवरी), गंगाधर तळपदे(तिरोडा),शिल्पा सोनाळे (अर्जुनी/मोरगाव), जिल्हा पुरवठा अधिकारी देवराव वानखेडे, तहसिलदार सर्वश्री राजेश भांडारकर (गोंदिया) विनोद मेश्राम (अर्जुनी/मोरगाव) श्री.सी.जी. पित्तलवार(सालेकसा), प्रशांत घोरुडे(तिरोडा), डी.एस भोयर( आमगाव), विजय बोरुडे (देवरी),अपर तहसीलदार अनिल खडतकर,नायब तहसलिदार राजेश वाकचौरे, आर.एम खोकले,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे तसेच सर्व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.



# तेढवा व पांजरा येथे वाळू माफियांचा नायब तहसीलदार व तलाठ्यावर हल्ला

**गोंदियाः–** रेती माफीयांकडून नायब तहसीलदार आणि तलाठ्यावर हल्ला करण्यात आल्याची घटना गुरूवारी (दि.११) व शनिवारी गोंदिया तालुक्यातील तेढवा रेती घाटावर तसेच झिलमिली पांजरा येथे घडली. या घटनेचा विदर्भ तहसीलदार व नायब तहसीलदार संगठना तसेच महाराष्ट्र राज्य महसुल कर्मचारी संघटना शाखा गोंदियाच्यावतीने निषेध करण्यात आला. पथकावर दगडफेक करुन हल्ला करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी डॉ.कादबंरी बलकवडेंना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

दिवसेंदिवस वाळूमाफियांची दहशत वाढतच चालली असून त्यांच्या मनात पोलीस प्रशासनाची व कायद्याची भितीच उरली नसल्याचे चित्र समोर येऊ लागले आहे. त्याचे असे की शनिवारला १३ जून रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाने लिलाव झालेला वाळू साठा ताब्यात घेण्यासाठी गेलेले तलाठी सुनिल शहारे व थुलकर यांच्यावर तालुक्यातील पांजरा येथील दोन वाळुमाफियांनी जिवघेणा हल्ला करीत मारझोड केल्याची घटना घडली. त्यातच आम्ही गोळा केलेली वाळू आणि तिचा साठा तुम्हाला लिलाव करण्याचा कुणी अधिकार दिला असे बोलून तलाठ्यांच्या हातात असलेले शासकीय कागदपत्रे फेकून घटनास्थळावरुन फरार झाले.

घटनेची माहिती लगेच उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांना भ्रमणध्वनीद्वारे देण्यात आली. त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी पोलीस विभागालमा दिलेल्या माहितीनंतर रावणवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरिक्षक जोकार व वांगडे यांनी घटनास्थळी दाखल होत कारवाई केली. यावेळी अप्पर तहसिलदार अनिल



खळतकर, नायब तहसिलदार सचिन पाटील, गणपत शिंगाडे, तलाठी संघटनेचे अध्यक्ष सुनिल राठोड यांनी पोलीस ठाण्यात उपस्थित राहून मारहाण झालेले तलाठी शहारे व थुलकर यांची चौकशी करीत प्रशासन सोबत असल्याचे आश्वासन दिले.

वाळूमाफिया असलेल्या गादीराम मटाले व महेश फरकुंडे या दोंघावर ३५३ कलमा खाली गुन्हा दाखल करीत गादीराम मटालेला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गेल्या दोनतीन दिवसात तलाठ्यांवर हल्ला होण्याची ही दूसरी घटना असून वाळू माफियांचे मनसुबे चांगले दिसून येत नसल्याने तलाठ्यामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे वाळुतस्करीमध्ये गुन्हेगारी स्वरुपातील काही गोंदियातील लोकांचे पाठबळ वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्यांना असल्याचे बोलले जात आहे.

गोंदिया तालुक्यात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज वाहतुकीवर आळा घालण्यासाठी नायब तहसीलदार सचिन पाटील यांच्या नेतृत्वातील पथक गुरुवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास गस्तीवर असताना रेतीची चोरी करुन वाहतूक करीत असताना कारवाईसाठी गेले असता ट्रॅक्टर, ट्रक चालक व मालकांसह हमालांनी त्यांच्या पथकावर लाठ्याकाठ्यांसह दगडफेक करुन हल्ला केला होता. त्या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी १२ जून रोजी काळ्या फिती लावून काम केले. निवेदन देतेवेळी राजेश मेमन, आशिष रामटेके, राकेश डोंगरे, महेश कंचनवार, सुपचंद सिल्लारे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ४०२ जवानांना आंतरिक सुरक्षा सेवा पदक जाहीर

**गोंदिया:** जिल्हा आदिवासी व नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील आहे. येथील पोलीस जवानांनी उत्तम सेवा केल्यामुळे ४०२ अधिकारी, कर्मचारी यांना आंतरिक सुरक्षा सेवा पदक देवून सम्मानित करण्यत येणार आहे. तत्कालीन पोलीस अधीक्षक हरिष बैजल यांनी त्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव पाठविला होता. त्यामुळे आता त्या अधिकारी कर्मचाऱ्यांना हा सम्मान १५ ऑगसट रोजी दिला पाहिजे होते. मात्र फार उशीरा पोलीस कर्मचाऱ्यांच्या छातीवर लावून त्यांचा सम्मान करण्यात आला होता. आता ४०२ अधिकरी कर्मचाऱ्यांना हे पदक जाहीर झाले. ते पदक १५ ऑगस्ट रोजी शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाप्रसंगी देणार की वेगळा सभारंभ आयोजित करुन त्यांना सम्मानित केले जाणार आहे. याबाबत अद्यापही कुठलीही माहिती नाही. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून आंतरिक



सुरक्षा सेवा पदक प्रदान केला जाणार आहे.

सतत दोन वर्षे नक्षलविरोधी अभियानात कामासह इतर उत्कृष्ट कामे करणाऱ्या पोलीस कर्मचारी अधिकाऱ्यांना हा सम्मान दिला जातो. ११७२ जवानांना आंतरिक सुरक्षा पदक देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. १० जून २०२० रोजी जाहीर करण्यात आलेल्या यादी गोंदिया जिल्ह्यातील ४०२ पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश आहे. एओपी चौकीदार तसेच सीमेवर तैनात असलेल्या जवानांना प्रोत्साहित करण्यासाठी हा सम्मान दिला जातो. दोन वर्ष नक्षलग्रस्त भागात नोकरी केल्यानंतर त्यांच्या नावाचा प्रस्ताव हा सरकारला पाठविण्यात येतो. ७ डिसेंबर २०१८ ला १०८ जवानांना आंतरिक सुरक्षा सेवा पदा प्रदान करण्यात आले होते. ते पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आलमारीत धुळखात पडले होते. ते ज्यांचे होते त्यांना द्यायला सुरक्षा सेवा पदक प्रदान केला जातो. महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा या चार नक्षलग्रस्त भागात दोन वर्ष उत्कृष्ट सेवा व नक्षलविरोधी अभियानात उत्तम कामगिरी करणाऱ्यांना हा सम्मान दिला जातो. गोंदियाचे तत्कालीन पोलीस अधीक्षक हरिष बैजल यांनी २१ डिसेंबर २०१८ ला ३४६ नावांचे प्रस्ताव केंद्रीय गृह मंत्रालयाला पाठविले होते.

**सम्मान मिळालेले अधिकारी**

ज्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना शौर्य आंतरिक सुरक्षा पदक जाहीर झाले. त्यात तत्कालीन पोलीस अधीक्षक दिलीप भुजबळ, चार उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते, राजीव नवले, दिपाली खन्ना, मंदार जवळे आणि १५ पोलीस निरीक्षक, १२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ४५ पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नायक व पोलीस शिपाई यांचा समावेश आहे.

# ओबीसी महासंघाच्या लढ्याला यश

**गडचिरोली:** गडचिरोली जिल्ह्यासह राज्यातील आठ जिल्ह्यात ओबीसींचे कमी केलेले आरक्षण पूर्ववत १९ टक्के करावे, यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाने राज्य व राष्ट्रीय स्तरावर वेगवेगळ्या लढ्याच्या माध्यमातून पाठपुरावा केला होता. या लढ्याला आता यश आले असून ओबीसी, एनटी/व्हीजे प्रवर्गाची अद्ययावत लोकसंख्या विचारात घेऊन वर्ग ३ व ४ ची पदे भरण्यासाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी राज्य सरकारने आठ सदस्यीय उपसमिती गठित केली आहे.

तत्कालीन सरकारने १ सप्टेंबर १९९७ व २५ सप्टेंबर २००२ च्य शासन निर्णयाद्वारे गडचिरोली जिल्ह्यातील ओबीसींचे आरक्षण १९ टक्क्यावरुन ६ टक्क्यावर आणले. चंद्रपूर जिल्ह्यात ११ टक्के, यवतमाळ १४ टक्के, नाशिक, धुळे, नंदूरबार, ठाणे जिल्ह्यात अनुक्रमे ९ टक्के आरक्षण करण्यात आले.

जिल्हा उद्योगविरहित व चार महिने धानाच्या शेतीवर अवलंबून असल्यामुळे आरक्षण कपातीचा सर्वाधिक फटका जिल्ह्यातील ओबीसींना बसला. जिल्ह्यातील वर्ग ३ व ४ संवर्गातील नोकऱ्यांमधील सर्व दारे ओबीसी प्रवर्गासाठी पूर्णपणे बंद झाली होती. त्यातच ९ जून २०१४ च्या राज्यपालांच्या अधिसूचननेनुसार अनुसूचित क्षेत्रात १०० टक्के अनुसूचित जमातीची पदे भरली जाऊ लागली. त्यामुळे जिल्ह्यातील ओबीसींचे आरक्षण शून्यावर पोहोचले. राज्य सरकारने अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या उपसमितीच्या निर्णयाचे ओबीसी महासंघाने स्वागत केले आहे. तसेच अन्यायकारक अध्यादेश रद्द करावा अशी मागणी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर यांनी केली आहे.

# वसतिगृहातील इतर मागास वर्गाच्या आरक्षणात खोडा

**चंद्रपूर:** सामाजिक न्याय विभाग अंतर्गत येणाऱ्या वसतिगृहात प्रवेशासाठी विभागीय, जिल्हास्तरावर विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग ओबीसी विद्यार्थ्यांना आघाडी सरकारने १० टक्के आरक्षण दिले होते. मात्र सध्यच्या युती सरकारने हे आरक्षण २.५ टक्के केले आहे. त्यामुळे गुणवंत ओबीसी विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

जिल्हास्तरावरील १०० तर विभागीय स्तरावरील सात वसतिगशहांसांठी राज्य सरकारने नवीन आरक्षण प्रणाली लागू केली आहे. यानुसार, विशेष मागास प्रवर्गासाठी केवळ २ टक्के तर इतर मागास प्रवर्ग ओबीसींसाठी २.५ टक्के आरक्षण देण्याचा शासन निर्णय २१ डिसेंबर २०१८ काढण्यात आला आहे.

या नवीन आरक्षणानुसार अनुसूचित जाती ८० टक्के, अनुसूचित जमाती ३ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती ५ टक्के, आर्थिकदृष्ट्या मागास २.५ टक्के, इतर मागास प्रवर्गासाठी २.५ टक्के, विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के, अपंग ३ टक्के, अनाथांसाठी २ टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी आधीच स्वतंत्र वसतिगृहाची व्यवस्था नसताना त्यात पुन्हा सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहातील आरक्षणसुद्धा कमी करण्यात आले आहे. विशेष म्हणजे विधीमंडळ अधिवेशनात सरकारने ओबीसींसाठी स्वतंत्र वसतिगृह निर्माण करण्याचे धोरण केली. मात्र अद्याप त्यावर कोणताच निर्णय झाला नाही.

**शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा डाव**

यासंदर्भात राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांच्यशी संपर्क साधला असता ते म्हणाले ओबीसी विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश नाकारुन त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा हा डाव आहे. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजना लागू करा अन्यथा, येत्या निवडणुकीत ओबीसी विद्यार्थी सरकारला त्यांची जागा दाखवतील.

# ओबीसी विद्यार्थ्यांना गणवेशाकरिता निधी द्या



**ब्रम्हपुरी:** दारिद्र्य रेषेखालील ओबीसी विद्यार्थ्यांना गणवेश मिळत नसल्याने जिल्हा निधीतून किंवा ग्रामपंचायत तथा नगर परिषदेला देण्यात येणाऱ्या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून गणवेशासाठी निधी द्यावा, अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी–अधिकारी महासंघाच्या शिष्टमंडळांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

जि.प.मधील पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या जाती–जमातीच्या तसेच दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत दोन गणवेश देण्यात येतात. मात्र सदर योजनेतून बीपीएलधारक नसलेल्या ओबीसी विद्यार्थ्यांना गणवेशाची तरतूद नाही.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची व गरिबांची मुले गणवेशापासून वंचित राहू नये, त्यामुळे १५ व्या वित्त आयोगातून निधी द्यावा, तसेच विद्यार्थ्यांना सॅनिटायझर, मास्क, हॅंडक्लोज उपलब्ध करुन द्यावा, शाळा सुरु करण्यापुर्वी सर्व इमारतीचे निर्जंतुकीकरण करण्यात यावे, बिंदूनामावलीनुसार ओबीसी संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरावी आदि मगण्यांचे निवेदन तहसीलदार विजय पवार यांच्यामार्फत मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, पालकमंत्री यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

# ताडोबात वाघाचे २ बछडे आढळले मृतावस्थेत

**चंद्रपूर :** राष्ट्रीयच नव्हे, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात असणाऱ्या ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पात लॉकडाऊन काळात माया व छोटी तारा या दोन वाघिणींनी ८ बछड्यांना जन्म दिला असल्याची बातमी ताजी असताना दुसरीकडे ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बफर झोन मधील मोहली वनपरीक्षेत्रात दोन वाघाचे बछडे दोन माकडांसह कुजलेल्या अवस्थेत मृतावस्थेत आढळले. यामुळे खळबळ उडाली आहे. सदर घटना रविवारी दुपारी उघडकीस आली. सदर वन्यजीवांचा मृत्यू हा विषबाधेने झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



लॉकडाऊन काळात ताडोबातील सर्वाधिक लोकप्रिय वाघीण माया (टी–१२) हिने पाच बछड्यांना जन्म दिला आहे, तर दुसरीकडे छोटी तारा (टी–७) या प्रख्यात असणा?या वाघिणीने कोलारा वनपरीक्षेत्रातील जामणी भागात ३ बछड्यांना जन्म दिला आहे. मार्च महिन्यात एकूण ८ बछडे जन्माला आले असून त्यांची विशेष काळजी घेतली जात आहे. सदर गोड वार्ता सर्वत्र असताना दुसरीकडे ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील मोहली वनपरीक्षेत्राच्या सीतारामपेठ नियतक्षेत्रामध्ये गस्त घालताना वाघाचे दोन बछडे मृतावस्थेत आढळले. त्याच ठिकाणी शेजारी दोन माकडाची पिल्लेही कुजलेल्या अवस्थेत आढळल्याने खळबळ उडाली आहे. वाघाचे बछडे व माकडाची पिल्ले येथील कोंडेगाव तलावाजवळ आढळले असून यामागचे कारण अद्याप कळू शकलेले नाही. विषबाधेतून हा प्रकार घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला असून याप्रकरणी तातडीन तपास सुरू करण्यात आला आहे.

# ७३८ कोटींच्या भंडारा बायपास रस्त्याला मंजुरी

**भंडाराः** शहराच्या मध्यभागातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग दुपदरी असून जड वाहनांमुळे दररोज घडणा?या अपघातांत अनेकांचा मृत्यू होत असतो. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक व जिल्हा परिषदेसह अन्य शासकीय कार्यालये याच रस्त्याला लागून असल्याने नागरिकांची प्रचंड वर्दळ असते. त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी खा. सुनील मेंढे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी चर्चा करुन नवीन बायपास रस्ता मंजूर करुन घेतला आहे. बायपास रस्त्याचे बांधकाम, भुसंपादन व अन्य कामांसाठी ७३८ कोटी ६७ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या बायपास रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असून नागरिकांचा त्रास कमी होणार आहे.



मुंबई ते कोलकता हा राष्ट्रीय महामार्ग भंडारा शहरातून जात असल्याने सर्व जड व प्रवासी वाहतूक याच मार्गावरून होते. जिल्हा परिषद, जिल्हा न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारतीतील अनेक कार्यालये याच मार्गावर आहेत. त्यावरून भरधाव जाणा?या वाहनांमुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. नागपूरहून निघालेला राष्ट्रीय महामार्ग ५३ (जुना क्र.६) चार पदरी असला तरी मुजबी ते पलाडीपर्यंतचा रस्ता दोन पदरी असल्यामुळे शहरवासियांना त्याचा काहीच फायदा होत नव्हता. उलट अपघाताची नेहमीच भिती असायची.

खा. सुनील मेंढे यांनी ही समस्या शासन दरबारी लावून धरली. त्यांच्या पुढाकाराने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नवीन बायपास रस्त्याच्या कामाला मंजुरी दिली आहे. प्रकल्पाची सर्व तांत्रिक कामे पूर्ण झाली असून प्रस्तावित मार्ग शहापूर, बेला वरुन वळण घेऊन तीर्थक्षेत्र कोरंभी येथे वैनगंगेवर नवीन पूल बांधून गिरोला, भिलेवाडा मार्गावर चारपदरी रस्त्याला मिळणार आहे. जमीन संपादनासाठी भारत सरकार तर्फे राजपत्र प्रकाशित करण्यात आले आहे. या बायपास रस्त्याचे काम पूर्ण होताच सर्व प्रवासी व माल वाहतूक येथून वळवली जाईल.

या बायपास रस्त्याची लांबी १४ किलोमीटर असणार आहे. यासाठी ५६.८९ हे.आर. जमिन १३ गावांमधून संपादीत करायची आहे. आजीमाबाद, बेला, भिलेवाडा, दवडीपार, दिघोरी, गिरोला, हंसापूर, खापा, कोरंभी, पलाडी, सालेबडी, सिरसघाट, उमरी येथील जमिनीचे संपादनाचे काम सुरूझाले आहे. या रस्त्याच्या प्रत्यक्ष बांधकामाचा खर्च ६१८.७५ कोटी रुपये असून भुसंपादन व युटीलीटी शिफ्टींगसह ७३८ कोटी ६७ लाख रुपयांचा खर्च यावर होणार आहे.

# एसआरपीएफ पोलिस प्रशिक्षण दरम्यान बंदुकीतून झालेल्या फायरींगची चौकशी करावी–आमदार फुके

**गोंदिया:–** जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील चिडचाडबांध पंचवटी येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे त्या ठिकाणी प्रशिक्षण दरम्यान फायरींग चे हि प्रशिक्षण देण्यात येत असून केंद्राजवळच लोकवस्ती आहे. पोलीस प्रशिक्षण सुरू असतांना प्रत्येक वेळी गावात सतर्कतेचा इशारा दिला जातो. मात्र शनिवारी दि. ६ जुन ला दुपारी १२ वाजता नागरिकांना सुचना न देता चार दिवसा पासून एस आर पी एफ चे प्रशिक्षण सुरू होते. त्या वेळी सितेपार येथील वर्षा सुरेश पटले ही गर्भवती महिला स्वतःच्या घरी अंगणात कपडे वाळावत असतांना अचानक प्रशिक्षण सुरु असलेल्या पोलिसांच्या बंदुकीतून निघालेली गोळी त्या महिलेच्या पायाला लागल्याने तिला जखम झाली. श



घरच्यांनी वेळीच तिला उपचारासाठी ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. व तिच्या वर वेळेत उपचार करून तिला घरी परत आणले वरील प्रकरणामध्ये गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी देखील डिसेंबर महिन्यात अशाच प्रकारची घटना घडली असून उपरोक्त विषयावर सखोल चौकशी करून तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी माजी पालकमंत्री तथा आमदार डॉ. परिणय फुके यांनी गृहमंत्री श्री अनिल देशमुख यांना दिलेल्या पत्राद्वारे केलेली आहे.

# मासेमार समाजाच्या समस्यांची दखल घ्या–आ.चंद्रिकापुरे

**सडक अर्जुनी :** कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या लॉकडाऊनचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे. त्यातच मासेमारी करून उपजिविका चालणारे मासेमार समाजावरही याचा फटका बसला असून मासेमार करणारे कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे शासनाने मासेमार समाजांची दखल घेवून समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी मासेमार समाजाकडून करण्यात आली. मागणीचे निवेदन आ.मनोहर चंद्रिकापुरे यांना देण्यात आले.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर २३ मार्चपासून देशासह राज्यात लॉकडाऊन करून संचारबंदी लागू करण्यात आली. यामुळे मार्च महिन्यापासून गोड्या पाण्यातील मासेमारी करणारे समाज आर्थिक संकटात सापडले आहेत. संचारबंदी असल्याने मासेमारी करू शकले नाही, शिवाय उन्हयात नद्या, नाल्यांमध्येही मासेमारी करता आली नाही. ज्या मासेमारांनी तलाव घेवून माश्यांचे उत्पादन घेतले त्यांना उत्पन्न काढता आले नाही. त्यामुळे अशा दुहेरी संकटात सापडलेल्या मासेमारांना शासनाकडून न्याय देण्यात यावा, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत असलेल्या तलावांची लीज माफ करण्यात यावी, जिल्ह्यातील मासेमारांना किसान क्रेडिट कार्ड उपलब्ध करून द्यावे, आदी मागण्यांचे निवेदन आ. मनोहर चंद्रिकापुरे यांच्या मार्फत शासनाला सादर करण्यात आले.

यावेळी उमराव मांढरे, शोभराम मलाम, राजु शेंडे, हस्कू भानारकर, मंगर वलथरे, शिवचरण वलथरे, सुनील शेंडे, मनोहर सयाम, छगनलाल मेश्राम, सोमा मेश्राम, मनोहर मेश्राम, तेजराम मेश्राम, अभिमन भांडारकर आदी उपस्थित होते.